# सेंटर पॉईंट स्कुल ने जिंकले टीसीएस आयटी विझ २०१६, नागपूर फेरीचे विजेतेपद



**नागपूर, २७ सप्टेंबर :** देशातील अग्रणी कन्सल्टन्सी व बिजनेस सोल्युशन्स कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे आयोजित भारतातील सर्वात मोठी आंतर-शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा, 'टीसीएस आयटी विझ' च्या नागपूर प्रादेशिक फेरीत विविध शाळांच्या एकूण ८००विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मंगळवार, २७ सप्टेंबरला वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही निःशुल्क स्पर्धा आयोजित करण्यात येते. देशभरातील विविध शहरात आयोजित करण्यात येणारी टीसीएस आयटी विझ नागपुरात २०१२ पासून आयोजित करण्यात येत आहे. यावर्षीच्या स्पर्धेची संकल्पना 'डिफॉल्ट इज डिजिटल' ही होती. जागतिक स्तरावरील तंत्रज्ञानातील वेगवेगळ्या पैलूंवर या प्रश्नमंजुषेद्वारे प्रकाश टाकल्या जातो. प्रश्नमंजूषेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या ज्ञानाचा त्यांच्या भविष्यात फायदा होईल. लेखी प्राथमिक फेरीद्वारे प्रादेशिक अंतिम फेरीसाठी सहा टीम निवडण्यात आल्या. टीसीएस आयटी विझ २०१६ भारतभरात पंधरा ठिकाणी घेण्यात आली. यात अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदोर, कोची कोलकाता, लखनऊ, मुंबई, नागपूर, पुणे व विशाखापट्टणम या शहरांचा समावेश होता.

प्रादेशिक अंतिम फेरीतील प्रश्नमंजुषेच्या पाच फेऱ्यांनंतर सेंटर पॉईंट स्कुल (काटोल रोड) शाळेच्या मोहम्मद तहा उद्दीन व देवेंश राजपूत या विद्यार्थ्यांनी स्पर्धा जिंकली. प्रादेशिक अंतिम फेरीतील विजेत्यांना प्रत्येकी एक आयपॅड देऊन, तर उपविजेते ठरलेल्या शिवाजी सायन्स ज्युनिअर कॉलेजच्या कुणाल वासनिक व ऋत्विक गुप्ते यांना मिनी आयपॅड तसेच स्मृतीचिन्ह व पदक देऊन गौरविण्यात आले. यासोबतच अंतिम फेरीतील सर्व ६ स्पर्धक चमूंना टीसीएस तर्फे स्पेस पॅक, सेल्फी स्टिक, इअरफोन्स, ब्लूटूथ स्पिकर्स व पेन ड्राइव्ह असे आकर्षक बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या टीमला एक शिक्षक/पालकासोबत विमानाद्वारे मुंबईला नेण्यात येईल.

टीसीएस इंटर्नल आयटी अँड शेअर सर्व्हिसेस चे उपाध्यक्ष व जागतिक प्रमुख श्री. आलोक कुमार यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन गिरी 'पिकब्रेन' सुब्रमण्यम यांनी केले.